| | |
|---|---|
| **MHAK070001062012** | <u>**नियमित दिवाणी दावा क्र. १६/२०१२ मधील**</u><br><u>**निशाणी क्र.२०३ वर आदेश**</u><br>दिपककुमार वि. राजकुमार<br>(दिनांक २२ ऑक्टोबर, २०२४) |

**१.** प्रस्तुत अर्ज वादीतर्फे दाखल करण्यात आला असून त्यामध्ये असे कथन करण्यात आले आहे की, सदर दावा हा वाटणी, स्वतंत्र ताबा आणि मनाई हुकुमाकरीता दाखल केलेला असून त्यामध्ये दरम्यानचे उत्पन्नाची सुध्दा मागणी केलेली आहे. दाव्यामधील परिच्छेद क्र.१ मध्ये नमुद केलेल्या शेत मिळकती असून त्या मिळकती प्रतिवादींच्या ताब्यात असून त्यांनी शासनातर्फे मिळालेले अनुदान, मदत, योजना, सबसीडी इत्यादींचा लाभ प्रतिवादींनी वेळोवेळी घेतलेला आहे. त्यामुळे प्रतिवादींनी त्यांना शासनातर्फे मिळालेल्या उत्पन्नाचा संपुर्ण कागदपत्रांसहीत तपशिल सादर करावा, असे निर्देश देणे आवश्यक आहे. सबब, प्रस्तुत अर्ज मंजुर करुन विविध योजनेअंतर्गत शासनातर्फे मिळालेला लाभाचा तपशिल प्रतिवादींनी सादर करण्याचे निर्देश देण्यात यावेत, अशी विनंती वादीने केली आहे.

**२.** प्रस्तुत अर्जास प्रतिवादी क्र.१ ते ३ तर्फे लेखी जबाब (नि.क्र.२०५) दाखल करुन प्रखर विरोध करुन त्यांनी असे कथन केले आहे की, प्रस्तुत अर्ज कायद्याच्या तरतूदीनुसार दाखल केलेला नाही. प्रतिवादींनी दाव्यामध्ये नुकसान भरपाईविषयी कोणतीही मागणी केलेली नाही. दाव्यामध्ये दोन्ही पक्षकारांचा अंतिम युक्तिवाद झाल्यानंतर प्रस्तुत अर्ज दाखल करण्यात आला आहे. प्रस्तुत अर्ज केवळ प्रकरण लांबविण्याच्या उद्देशाने सादर केला आहे. सबब, प्रस्तुत नामंजूर करण्याची विनंती प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी केली आहे.

**३.** अर्ज, म्हणणे व अभिलेख पाहिला तसेच वादीतर्फे ॲड ए. पी. जगताप आणि प्रतिवादी क्र.१ ते ३ तर्फे ॲड एस. टी. इंगळे यांचा युक्तीवाद ऐकला, इतर प्रतिवादींतर्फे कोणीही हजर नाही.

**४.** अर्जाचे आणि अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येत आहे की, प्रस्तुत दावा दिनांक १२.०७.२००१ रोजी दाखल झालेला असून त्यामध्ये सर्व पक्षकारांचा अंतिम युक्तीवाद पुर्ण झालेला असून प्रकरण न्यायनिर्णयाकरीता होते, परंतु

न्यायालयाने प्रकरणाचा अभिलेख तपासला असता दाव्यातील परिच्छेद क्र.१–अ मध्ये नमुद केलेल्या शेत मिळकती कोणत्या गावामध्ये अस्तित्वात आहेत, याविषयी काहीही नमुद केले नसल्याचे न्यायालयाच्या निदर्शनास आले. त्यामुळे दिनांक ०७.०५.२०२४ रोजी नि.क्र.१ वर आदेश पारीत करुन दाव्यातील परीच्छेद क्र.१–अ मधील वाद मिळकतींचे वर्णन अपुरे असुन त्याची दखल घेण्यात यावी, असा आदेश पारीत करण्यात आला होता. त्यानंतर, वादीतर्फे दाव्यामध्ये दुरुस्ती करण्याकरीता अर्ज (नि.क्र.२०४) सादर करण्यात आला आणि त्याचसोबत प्रस्तुत अर्ज (नि.क्र.२०३) सुध्दा दाखल करण्यात आलेला आहे.

**५.** प्रस्तुत दाव्यामध्ये अंतिम युक्तीवाद झाल्यानंतर वाद मिळकतीचे वर्णन अपुरे आहे, हे लक्षात आल्यामुळे दाव्याचा निकाल गुणदोषावर होण्यासाठी दाव्यामध्ये दुरुस्तीचा अर्ज करण्यात आलेला आहे. सरकारी अनुदान, मदत, योजना, सबसीडी इत्यादींचा प्रतिवादींनी घेतलेल्या लाभाचा तपशिल त्यांनी अभिलेखावर दाखल करण्याचे निर्देश देण्यात यावेत, असा अर्ज प्रतिवादींनी यापुर्वीच देणे अपेक्षित होते. दाव्याच्या या टप्प्यावर अशा प्रकारचा अर्ज दाखल करणे अपेक्षित नाही. याउपरही, वादीने केलेला अर्ज हा मोघम स्वरुपाचा दिसून येत असून त्यामध्ये शासनातर्फे कोणकोणत्या योजनांचा लाभ प्रतिवादींनी घेतला आहे, याबाबत काहीही नमुद केलेले नाही. दाव्यामध्ये दरम्यानची उत्पन्नाची मागणी जरी करण्यात आली असेल तरी अद्याप दाव्याचा अंतिम निर्णय झालेला नाही. दावा २० वर्षांपेक्षा जुना असून यापुर्वी वादीला संधी उपलब्ध होती. प्रस्तुत अर्ज दाव्यामध्ये अंतिम युक्तिवाद पुर्ण झाल्यानंतर सादर केलेला असल्यामुळे दाव्या कोणत्या टप्प्यावर (Stage) प्रलंबित आहे, ही बाब विचारात घेणे अत्यंत गरजेचे आहे. सबब, पुढीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

प्रस्तुत अर्ज नि.क्र.२०३ नामंजुर करण्यात येत आहे.

VISHNU DATTARAO GITE
Digitally signed by VISHNU DATTARAO GITE
Date: 2024.10.22 15:44:11 +0530

**दिनांक : २२/१०/२०२४.**
**ठिकाणः बाळापूर**

**( विष्णु द. गिते )**
**सह दिवाणी न्यायाधीश, (क.स्तर),**
**बाळापूर.**

| | | |
|---|---|---|
| I affirm that the contents of this P.D.F. File Judgment/Order are same, word to word, as per the original order. | | |
| Name of the Court | :- | **Shri. Vishnu D. Gite**<br>Jt. Civil Judge, J.D. & J.M.F.C., Balapur |
| Name of the Stenographer | :- | Ajay N. Hande |
| Date of Decision | :- | 22/10/2024 |
| Order signed by P.O on | :- | 22/10/2024 |
| Order uploaded on | :- | 22/10/2024 |